# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:08.02.2026** **वार:रविवार**

**ठळक बातम्या**

**- भारताचे डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म यूपीआय लवकरच मलेशियामध्ये सुरू होईल पंतप्रधानांची मलेशियात ग्वाही.**

**- १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी.....%मतदान.**

**- आगामी काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर असेल– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही.**

**- विदर्भात १० हजार कोटीं रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूकीचे करार.**

**- गडचिरोली जिल्ह्यात सुरक्षादलांच्या कारवाईत ७ नक्षली ठार.**

**आणि**

**- वीस षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताची विजयी सुरुवात.**

आता सविस्तर बातम्या

**पंतप्रधान**

भारताचे डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म यूपीआय लवकरच मलेशियामध्ये सुरू केले जाईल. अशी ग्वाही पंतप्रधानांनी क्वालालंपूर इथं भारतीय समुदायाला संबोधित करताना दिली. भारत आणि मलेशिया यांच्यातील वैयक्तिक आणि द्विपक्षिय धोरणात्मक व्यापक भागिदारी संबंध दृढ ठेवण्यात मलेशियातील भारतीय समुदाय हा दोनही राष्ट्रांतील नागरिकांची मने जोडणारा दुवा आहे. समृद्ध मलेशिया आणि विकसित भारताच्या दृष्टिकोनात योगदान दिल्याबद्दल त्यांनी भारतीय समुदायाची प्रशंसा केली. यावेळी भारतीयांशी संवाद साधताना पंतप्रधान म्हणाले…

**बाईट: पंतप्रधान नरेंद्र मोदी**

व्यापार, गुंतवणूक, उर्जा आणि सागरी सुरक्षा या क्षेत्रातील दोनही देशांतील संबंध अधिक दृढ होण्यास मदत होईल असं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. १० भारत-मलेशिया मुख्य कार्यकारी अधिकारी बैठकही आज होण्याची अपेक्षा आहे. पंतप्रधान मलेशियाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी काल क्वालालंपूर इथं पोहोचले. विमानतळावर त्यांचं भव्य स्वागत करण्यात आलं.

**भारत-अमेरिका**

भारत आणि अमेरिका दरम्यान परस्पर लाभाच्या व्यापारासंदर्भात अंतरिम करारासाठीच्या मुद्यांची घोषणा दोन्ही देशांनी काल केली. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने भारत-अमेरिका संयुक्त निवेदन काल जारी केलं. संयुक्त निवेदनानुसार, अमेरिका भारतीय वस्तूंवर १८ टक्के शुल्क दर लागू करेल. भारत अमेरिकेच्या सर्व औद्योगिक वस्तू, अन्न आणि कृषी उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीवरील शुल्क शुन्य टक्के किंवा किमान केलं जाणार आहे. यासंदर्भात पंतप्रधानांनी समाजमाध्यमावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांचे आभार मानले आहे. भारतातील मेहनती शेतकरी, उद्योजक, एमएसएमई, स्टार्टअप नवोन्मेषक, मच्छीमार आणि इतरांसाठी नवीन संधी उपलब्ध होऊन 'मेक इन इंडिया'ला बळकटी मिळेल. यामुळे महिला आणि तरुणांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होतील. असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**पियुष-गोयल**

सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगक्षेत्र, शेतकरी आणि मच्छिमारांसाठी ३० ट्रिलिअन डॉलर्सची बाजारपेठ खुली झाली असल्याचं केंद्रिय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी काल नवी दिल्लीत परिषदेत भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत बोलताना सांगितलं. महिला आणि युवकांना मोठ्या संधी या निर्यातीतील वाढीमुळे उपलब्ध होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भारतासाठी संवेदनशील असलेल्या कोणत्याही क्षेत्राचं यामुळे नुकसान होणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली आहे. हा करार म्हणजे भारताच्या आर्थिक प्रवासातला महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. तर या करारामुळे भारत आणि अमेरिका यांच्यात परस्परांना लाभदायक भागीदारी साकारेल, असं मत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर यांनी व्यक्त केलं आहे.

**निवडणूक**

१२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायतसमित्यांच्या निवडणुकीसाठी शांततेत मतदान पार पडलं. निवडणूक आयोगाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार ...% मतदानाची नोंद झाली. यासाठीची मतमोजणी उद्या होणार आहे.

**मुख्यमंत्री**

धोरण आधारित गुंतवणूक, उद्योग आणि विकास हा महाराष्ट्र राज्याचा मंत्र असेल. असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूरमध्ये व्यक्त केला. ॲडव्हांटेज विदर्भ 2026 - खासदार औद्योगिक महोत्सवात 22 देशांचे विविध क्षेत्रातील प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमचे जागतिक अध्यक्ष जितेंद्र जोशी, असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांच्यासह विविध देशांचे राजदूत, उच्चायुक्त आणि व्यापारी प्रतिनिधी उपस्थिती होते. या परिषदेत गुंतवणुकीचे तीन सामंजस्य करारही पार पाडण्यात आले. याविषयी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणेवीस म्हणाले....

**बाईट: देवेंद्र फडणेवीस**

पुढील दहा वर्षांत गडचिरोलीत पोलादनिर्मितीची सर्वाधिक मोठी क्षमता उभी राहणार आहे. तर गडचिरोलीला पर्यावरणपूरक 'ग्रीन स्टील' हब म्हणून विकसित करण्याच्या दिशेनेही आम्ही ठोस पावले उचलत आहोत. असंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

हे प्रादेशिक बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.

**नक्षली-गचि-पीटीसी**

छत्तीसगड आणि भामरागड तालुक्याच्या सीमावर्ती भागात झालेल्या चकमकीत पोलिसांनी नक्षल्यांच्या कंपनी क्रमांक १० चा म्होरक्या प्रभाकरसह ७ जहाल नक्षल्यांना ठार केलं.  अशी माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी काल गडचिरोलीत झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. आता जिल्ह्यात केवळ ७ नक्षली शिल्लक राहिले असून, ३१ मार्चपर्यंत नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. ठार झालेल्या नक्षलींवर दोनशे गुन्हे दाखल होते आणिमहाराष्ट्र शासनाने त्यांची माहिती देणाऱ्यांसाठी एकंदर ७१ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याकारवाई बद्दल नक्षलविरोधी मोहिमेत सहभागी गडचिरोली पोलिस आणि C-60 पथकातील जवानांचं अभिनंदन केलं आहे.

बाईट: देवेंद्र फडणवीस
छत्तीसगडमधे काल ५१ नक्षलींचं आत्मसमर्पण केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**मुंबई-महापौर-अर्ज-पीटीसी**

मुंबईच्या महापौर पदासाठी भारतीय जनता पक्षाकडून रितू तावडे आणि उपमहापौर पदासाठी शिवसेनेकडून संजय घाडी यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अमित साटम, माजी खासदार राहुल शेवाळे, शिवसेना प्रवक्त्या शीतल म्हात्रे, पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते.
रितू तावडे प्रभाग क्रमांक १३२ मधून निवडून आल्या आहेत. तर मुंबईच्या उपमहापौरपदासाठी  मुंबईतील प्रभाग क्रमांक ५ मागाठाणेचे नगरसेवक संजय घाडी यांना शिवसेनेने उपमहापौरपदाची उमेदवारी दिली. महापौर आणि उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन अर्ज भरण्याची अंतिम मुदत कालपर्यंत होती.

**मालेगाव-पीटीसी**

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महानगरपालिकेच्या महापौरपदी 'इस्लाम' पक्षाच्या नसरीन बानो खालिद शेख तर उपमहापौरपदी 'समाजवादी पार्टी'च्या शान-ए-हिंद यांचा विजय झाला.जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेत ही निवडणूक प्रक्रिया पार पडली.८४ जागा असलेल्या मालेगाव महापालिकेत इस्लाम अर्थात इंडियन सेक्युलर लार्जेस्ट असेंबली ऑफ महाराष्ट्र या पक्षाने सर्वाधिक ३५ जागा जिंकल्या आहेत एमआयएमला २१ जागांवर समाधान मानावे लागले आहे. शिवसेना शिंदे गटाला १८ जागा मिळाल्या आहेत. इस्लाम आणि समाजवादी पार्टीने महापालिका निवडणुकीत सेक्युलर फ्रंट नावाची आघाडी स्थापन केली होती.

**नीती-आयोग-बीड-पीटीसी**

आपल्या देशाला महासत्ता करायचे असेल तर देशाचे शेतकरी आर्थिक सक्षम व्हावे लागतील. देशाला फलोत्पादनाची राजधानी करण्याच्या दृष्टीने सर्व उपाययोजना केंद्र शासनाच्या नियोजनानूसार सुरू ठेऊ असं आश्वासन देशाच्या नीती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद यांनी काल बीडमध्ये दिलं.

कृषिप्रधान आपल्या देशातील एकूण क्षेत्रापैकी केवळ 15% एवढीच फळबाग लागवड केली जाते. उत्तम दर्जाचे फळे देशातून निर्यात झाली पाहिजेत, हा देश फळबाग लागवडीची राजधानी व्हावा हे जलनायक मयंक गांधी यांचे स्वप्न आहे. असंही ते म्हणाले. कृषीकुल इथं महत्त्वपूर्ण नियोजन बैठकीत बोलत होते. डॉ.रमेश चंद हे दोन दिवसांच्या परळी वैजनाथ दौऱ्यावर आहेत.

**'मसाप'-पुरस्कार**

मराठवाडा साहित्य परिषदेचा 'कविवर्य कुसुमाग्रज काव्यपुरस्कार' ज्येष्ठ कवी लक्ष्मीकांत तांबोळी आणि 'कवयित्री लीला धनपलवार काव्यपुरस्कार' कवयित्री योगिनी सातारकर-पांडे यांना जाहीर करण्यात आला आहे. अशी माहिती 'मसाप'चे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांनी काल दिली.रोख ११ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. येत्या २७ फेब्रुवारी रोजी प्रदान करण्यात येतील.

**क्रिकेट**

वीस षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल मुंबईतल्या वानखेडे मैदानावर झालेल्या सामन्यात भारताने अमेरिकेचा २९ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारताने 161 धावा केल्या. तुलनेने अनुनभवी असलेल्या अमेरिकेच्या संघाने टिच्चून गोलंदाजी करत भारताची अवस्था 6 बाद 77 अशी केली होती. मात्र कर्णधार सूर्यकुमार यादवच्या 49 चेंडूतील 84 धावांनी आव्हानात्मक धावा केल्या. शॅडली वन शालवीक याने 4 गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल अमेरिका संघ 132 धावा करू शकला.

**हवामान**

आजसंपूर्ण राज्यात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या-**

**भारताचे डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म यूपीआय लवकरच मलेशियामध्ये सुरू होईलपंतप्रधानांची मलेशियात ग्वाही.**
**-१२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी.....%मतदान. -आगामी काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर असेल– मुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांची ग्वाही.**

**-विदर्भात १० हजार कोटीं रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूकीचे करार.**

**-गडचिरोली जिल्ह्यात सुरक्षादलांच्या कारवाईत ७ नक्षली ठार.**
**आणि**
**-वीस षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताची विजयी सुरुवात**

**याबरोबरच आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं , नमस्कार.**